




सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

• वर्ष २४ वे • अंक ३०७ • शनिवार दि.५ सप्टेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.


## दहीहंडीचा राज्यात थरार; २२ गोविंदा जखमी




मुंबई/प्रतिनिधी-श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त आज, शनिवारी (५ सप्टेंबर) राज्यभरात दहीहंडी उत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे, नाशिकसह विविध शहरांमध्ये गोविंदा पथकांनी मानवी मनोरे रचत दहीहंडी फोडण्यासाठी जोरदार तयारी केली आहे. मुंबई आणि ठाणे परिसरात मोठ्या दहीहंडी उत्सवांचे आयोजन करण्यात आले असून, लाखो रुपयांच्या बक्षिसांची घोषणा करण्यात आली आहे. मात्र, उत्साहाबरोबरच सुरक्षिततेचे आव्हानही कायम असून, मुंबईत दुपारपर्यंत २२ गोविंदा जखमी झाल्याची नोंद झाली आहे.

मुंबईतील विविध मंडळे, राजकीय पक्ष आणि सामाजिक संस्थांकडून भव्य दहीहंडीचे आयोजन करण्यात आले आहे. मोठ्या मैदानांमध्ये आकर्षक विद्युत रोषणाई, व्यासपीठ, ध्वनिव्यवस्था आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल आहे. हजारो गोविंदा पथकांनी यात सहभाग घेतला असून, उंचच उंच मानवी मनोरे रचण्याची चुरस रंगली आहे.दहीहंडीच्या उत्साहाला मुंबईत काही प्रमाणात गालबोट लागले आहे. उपलब्ध माहितीनुसार, दुपारी १२ वाजेपर्यंत मुंबईतील विविध सरकारी आणि महापालिका रुग्णालयांमध्ये २२ गोविंदा जखमी होऊन दाखल झाले होते. यापैकी २१ जणांना उपचारानंतर घरी सोडण्यात आले असून, एक गोविंदा अद्याप उपचाराधीन आहे. त्यामुळे उंच थर रचताना सुरक्षेच्या उपाययोजनांकडे विशेष लक्ष देण्याची गरज अधोरेखित झाली आहे. ठाण्यातील स्वामी प्रतिष्ठान दहीहंडी महोत्सव यंदा विशेष चर्चेत आहे. या महोत्सवात तब्बल ७१ लाख रुपयांची बक्षिसे वितरित पान ४ वर

## १८० कोटींच्या कर्जप्रकरणी सीबीआयचा सुभाष चंद्रा यांच्याविरोधात गुन्हा दाखल

मुंबई/प्रतिनिधी-एस्सेल समूहाचे अध्यक्ष सुभाष चंद्रा यांच्या अडचणीत वाढ झाली असून, ९८० कोटी रुपयांच्या कर्जप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने त्यांच्यासह अनेकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. एलआयसी हाउसिंग फायनान्स लिमिटेडच्या तक्रारीवरून कटकारस्थान आणि विश्वासघात केल्याच्या आरोपांखाली ही कारवाई करण्यात आली आहे.



एलआयसी हाउसिंग फायनान्सने दोन स्वतंत्र कर्ज सुविधांद्वारे एकूण ९८० कोटी रुपयांचे कर्ज दिले होते. त्यापैकी ५०० कोटी रुपयांचे कर्ज वसंत सागर प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेडच्या व्यवसायवाढीसाठी देण्यात आले होते. या कर्जात पॅन इंडिया इन्फ्रा प्रोजेक्ट्स सह-कर्जदार होती. या कर्जासाठी सुभाष चंद्रा यांनी २८ मार्च २०१८ रोजी वैयक्तिक हमी दिली होती.दुसरे ४८० कोटी रुपयांचे कर्ज डिजिटल सब्सक्राइबर मॅनेजमेंट कन्सल्टन्सी सर्व्हिसेसला भाडे उत्पन्नाच्या आधारे देण्यात आले होते. या कर्जात स्पिरिट इन्फ्रा पॉवर मल्टी व्हेंचर्स ही सह-कर्जदार कंपनी होती. या कर्जालाही चंद्रा यांनी वैयक्तिक हमी दिली होती. या कर्जांना मंजुरी देताना सुभाष चंद्रा यांच्या संपत्तीबाबत सादर करण्यात आलेल्या प्रमाणपत्रांवर आता प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. ५०० कोटींच्या कर्जासाठी डीआयएम अँड कंपनीने दिलेल्या प्रमाणपत्रात चंद्रा यांची निव्वळ संपत्ती ५९ हजार ११३ कोटी रुपये असल्याचे नमूद करण्यात आले होते.




महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन समन्वय संघ व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनांच्यावतीने जुनी पेन्शन योजना लागू करावी या मागणीसाठी आज (शनिवार) रोजी जि.प.कार्यालय ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत मूक मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## तुरुंगात विषप्रयोगाचा खा.संजय राऊतांना संशय

### राहुल गांधींच्या सल्ल्यानुसार टॉक्सिक टेस्ट करणार

मुंबई/प्रतिनिधी-शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खा.संजय राऊत यांनी तुरुंगात असताना आपल्या जेवणातून विषप्रयोग झाला असण्याची शक्यता व्यक्त केली आहे. तुरुंगातून बाहेर आल्यानंतरच आपली प्रकृती बिघडल्याचा दावा करत राऊत यांनी या संशयाची वैद्यकीय तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेस नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही आपल्याला टॉक्सिक टेस्ट



करण्याचा सल्ला दिल्याचे राऊत यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत सांगितले.

शुक्रवारी कोल्हापूर येथे एका कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार विजय चोरमारे आणि अमेय तिरोडकर यांनी संजय राऊत यांची मुलाखत घेतली. यावेळी राऊत यांनी तुरुंगातील परिस्थिती तसेच तुरुंगातून बाहेर आल्यानंतर उद्भवलेल्या आजाराबाबत भाष्य केले होते. त्यानंतर शनिवारी पत्रकार परिषदेत त्यांना, तुरुंगात असताना तुमच्यावर विषप्रयोग झाला होता का? असा सवाल करण्यात आला. त्यावर राऊत यांनी आपला संशय आणि त्यामागील कारणे स्पष्ट केली. खा.राहुल गांधी यांनीही याबाबत संशय व्यक्त केला आहे. सुमारे पान ४ वर

## पाच लाख रुपये खंडणीची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-एका महिलेकडे पाच लाख रुपये खंडणीची मागणी करणाऱ्या पाच जणांविरुध्द भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वेदांतनगर येथील बेबीताई शिंदे यांच्या निवासस्थानी गुरुवारी दुपारी दिलीपसिंग पवार, सुनील वाघमारे, लक्ष्मण पवार, अनिकेत सूर्यवंशी व बालाजी भारती हे पाच जण गेले होते. त्यांनी शिंदे यांना खंजरचा धाक दाखविला. परळीच्या गुन्ह्यात खोटी साक्ष दे असे म्हणून जीवे मारण्याची धमकी देत पाच लाख रुपये खंडणीची मागणी केली.


## नांदेड जिल्ह्यातील आठ गुन्हेगारांवर हद्दपारीची कारवाई

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यातील गुन्हेगारीचे उच्चाटन करण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांनी गुन्हेगारांविरुध्द कारवाईचा फास आवळला आहे. जिल्ह्यातील आठ गुन्हेगारांवर हद्दपारीची कारवाई करण्यात आली.

आगामी सण व उत्सव काळात शांतता रहावी व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये यासाठी पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांनी गुन्हेगारांविरुध्द कडक कारवाई करण्यास सुरुवात केली. मझहर खान पि.आरेफ खान (वय ३२) व खालेद खान पि.आरेफ खान (वय ३५) रा.मोहसीन कॉलनी, देगलूर नाका,नांदेड यांना नांदेड जिल्ह्यातून सहा महिन्यांसाठी हद्दपार करण्यात आले आहे. तसेच शिवाजी देविदास जाधव (वय ३६), परमेश्वर मारोती बोचरे (वय ४०) रा.वांगी ता.नांदेड, मोहमद इरफान मो.गौस (वय ४०), मो.फैजान मो.गौस (वय ३२) रा.हबीबीया कॉलनी, नांदेड, शेख सोहेल शेख शौकत उर्फ गाजा (वय २१), शेख सलमान उर्फ सल्ला महेबुब शेख (वय २६) रा.चिखली (बु.) ता.किनवट यांना एका वर्षासाठी नांदेड जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले. आठही गुन्हेगारांविरुध्द पोलीस ठाण्यात विविध गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत.

## शिक्षणमंत्री दादा भुसेंच्या अधिकारात कपात

### नवीन शाळा,तुकडी मान्यतेचे अधिकार सचिव व आयुक्तांकडे सुपुर्द



मुंबई/प्रतिनिधी-शाळांच्या मान्यता,तुकड्या व मंडळ संलग्नतेचे अधिकार आता शिक्षण मंत्र्यांऐवजी शिक्षण सचिव व शिक्षण आयुक्तांकडे सुपूर्द करण्याचा निर्णय राज्य सरकारने एक परिपत्रक काढून जारी केला आहे. त्यामुळे राज्याचे शिक्षणमंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निकटवर्तीय दादा भुसे यांच्या अधिकारात कपात करण्यात आल्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या निर्णयामुळे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या अधिकारांमध्ये कपात झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. मात्र, सरकारने हा निर्णय प्रशासकीय कामकाजात गती, पारदर्शकता आणि ई-गव्हर्नन्सला चालना देण्यासाठी घेतल्याचे स्पष्ट केले आहे.

शालेय शिक्षण विभागातील निर्णयप्रक्रिया अधिक गतिमान करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने विभागातील काही महत्त्वाचे अधिकार विकेंद्रित करण्याचा निर्णय घेतला आहे. नव्या निर्णयानुसार स्वयंअर्थसहाय्यित शाळांमधील नवीन वर्ग व शाखांना मंजुरी देणे, विद्यमान शाळांमध्ये वर्ग किंवा शाखांचा विस्तार करणे तसेच विविध शिक्षण मंडळांशी संलग्नतेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यासंबंधीचे अधिकार आता विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आले आहेत. त्यामुळे शालेय शिक्षण विभागातील महत्त्वाच्या निर्णयांमध्ये मंत्रिस्तरीय हस्तक्षेपाऐवजी प्रशासकीय पातळीवरच निर्णय घेण्याची प्रक्रिया अधिक बळकट होणार आहे.सरकारच्या निर्णयामागे विकसित महाराष्ट्र २०४७, शंभर टक्के ई-गव्हर्नन्स आणि प्रशासकीय कामकाजात गतिमानता ही प्रमुख उद्दिष्टे असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यानुसार स्वयंअर्थसहाय्यित शाळांमध्ये नवीन वर्ग अथवा शाखांना पान ४ वर

## पहाटेचा चिवचिवाट हरवला;चिमण्यांचा अधिवास धोक्यात

### वाढते सिमेंटचे जंगल,झाडांची घट आणि अन्न-पाण्याची कमतरता;निसर्गप्रेमींकडून चिंता



देगलूर/प्रतिनिधी-एकेकाळी पहाटेची सुरुवात चिमण्यांच्या मंजुळ चिवचिवाटाने व्हायची. घराच्या अंगणात, छपराच्या कडेला, झाडांच्या फांद्यांवर तसेच शेताच्या बांधावर चिमण्यांचे थवे सहजपणे दिसत असत. मात्र, बदलत्या जीवन शैलीसोबत हा परिचित चिवचिवाट हळूहळू कमी होत असून, अनेक भागांत पूर्वीच्या तुलनेत चिमण्या कमी दिसत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे पहाटेचा चिमण्यांचा चिवचिवाट हरवला कुठे? असा प्रश्न नागरिक आणि निसर्गप्रेमींकडून उपस्थित केला जात आहे.

पूर्वी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात झाडे, झुडपे, मोकळ्या जागा आणि पारंपरिक पद्धतीची घरे होती. या ठिकाणी चिमण्यांना घरटे बांधण्यासाठी सुरक्षित जागा, खाद्य आणि निवारा सहज उपलब्ध होत होता. मात्र, वाढते बांधकाम, सिमेंटच्या घरांची वाढ, झाडांची घट आणि मोकळ्या जागांचे आकुंचन यामुळे चिमण्यांच्या नैसर्गिक अधिवासावर परिणाम होत आहे. चिमण्यांच्या संख्येत घट होण्यामागे एकच कारण जबाबदार असल्याचे निश्चितपणे म्हणता येत नाही. शेतीतील बदल, कीटकनाशकांचा वाढता वापर, नैसर्गिक अधिवासाचा ऱ्हास, अन्न-पाण्याची कमतरता आणि बदलते हवामान अशा अनेक घटकांचा परिणाम पक्ष्यांच्या अस्तित्वावर होऊ शकतो. विशेषतः कीटकांची संख्या कमी झाल्यास चिमण्यांना मिळणारे नैसर्गिक खाद्यही कमी होण्याची शक्यता असते.

मोबाईल टॉवर किंवा अन्य कोणत्याही एका कारणामुळेच चिमण्यांची संख्या कमी झाली, असा ठोस निष्कर्ष काढण्यापेक्षा त्यांच्या अधिवासात झालेल्या एकूण बदलांचा विचार करणे गरजेचे आहे. चिमण्यांसह अन्य पक्ष्यांच्या अस्तित्वासाठी सुरक्षित जागा, पाणी, खाद्य आणि घरटे बांधण्यासाठी योग्य ठिकाणे उपलब्ध असणे अत्यंत महत्त्वाचे आहे.आधुनिक बांधकाम पद्धतीमुळे चिमण्यांसाठी उपलब्ध असलेल्या नैसर्गिक घरट्यांच्या जागाही कमी झाल्या आहेत. जुन्या घरांच्या छताखालील जागा, भिंतीतील कपारी आणि छोट्या फटी यांचा चिमण्या घरटे बांधण्यासाठी उपयोग करीत असत. आता मात्र आधुनिक घरांच्या रचनेत अशा जागा जवळपास राहिलेल्या नाहीत. परिणामी चिमण्यांना सुरक्षितपणे घरटे करण्यासाठी जागा शोधणे कठीण झाले आहे. चिमण्यांचे अस्तित्व हे केवळ एका पक्ष्याच्या संख्येशी संबंधित नसून, परिसरातील पर्यावरणीय समतोलाशीही जोडलेले आहे. त्यामुळे घरांच्या परिसरात पाण्याची भांडी ठेवणे, पक्ष्यांना योग्य खाद्य उपलब्ध करून देणे, झाडे-झुडपे वाढवणे आणि शक्य असल्यास कृत्रिम घरटी बसवणे, अशा छोट्या उपायांनी चिमण्यांसाठी अनुकूल वातावरण निर्माण करता येऊ शकते.हरवलेला चिवचिवाट पुन्हा ऐकायचा असेल, तर चिमण्यांसाठी निवारा, पाणी आणि खाद्य उपलब्ध करून देण्याची जबाबदारी समाजाने स्वीकारणे गरजेचे आहे.

## खा.संजय राऊत यांच्या उपस्थितीत शिवसेनेचे ११ रोजी आंदोलन

नांदेड/प्रतिनिधी-मराठवाड्याचा विकास तुमसे ना हो पायेगा! या अंतर्गत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्यावतीने शिवसेना नेते खा.संजय राऊत यांच्या उपस्थितीत शुक्रवार दि.११ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार आहे.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त राज्यातील महायुती सरकारने मराठवाड्याच्या विकासासाठी हजारो कोटी रुपयांच्या योजनांच्या घोषणा केल्या होत्या. परंतु मराठवाड्याच्या विकासाचा अनुशेष व अन्य मागण्या अजुनही प्रलंबित आहेत. सरकारने केलेल्या घोषणेतील योजनांची कामे किती चालू आहेत, किती प्रलंबित आहेत. याची वस्तुस्थिती व महायुती सरकारचे मराठवाड्याकडे केलेले दुर्लक्ष जनतेसमोर मांडण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्यावतीने दि.५ सप्टेंबर ते १७ सप्टेंबर या दरम्यान मराठवाड्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर 'मराठवाड्याचा विकास, तुमसे ना हो पायेगा!' या अंतर्गत आंदोलन केले जाणार आहे. शुक्रवार दि.११ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर खा.संजय राऊत, विधानपरिषदेचे माजी विरोधी पक्षनेते आ.आंबादास दानवे यांच्या उपस्थितीत शिवसेनेच्यावतीने आंदोलन केले जाणार आहे. या आंदोलनाला शिवसेनेचे अनेक वरिष्ठ नेते व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# जीडीपी वाढला,पण विकास नेमका कोणाचा?

**देशाचा विकास किती झाला, हे मोजताना आज सर्वांत आधी जीडीपीचा आकडा पुढे केला जातो. जीडीपी वाढला म्हणजे देशाची अर्थव्यवस्था वाढली, अर्थव्यवस्था वाढली म्हणजे देश प्रगतीच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत आहे, असा सरळ हिशेब मांडला जातो. सरकारही या आकड्याचा आधार घेत देशाच्या आर्थिक प्रगतीचे चित्र रंगवते. भारत महासत्तेकडे वाटचाल करीत असल्याचे सांगितले जाते. परंतु या सगळ्या दाव्यांमध्ये एक साधा आणि अत्यंत महत्त्वाचा प्रश्न मात्र अनुत्तरित राहतो, विकास नेमका कोणाचा होत आहे? जीडीपी वाढणे ही निश्चितच चांगली बाब आहे. देशात उत्पादन वाढले, उद्योग वाढले, गुंतवणूक वाढली आणि आर्थिक व्यवहारांना गती मिळाली तर त्याचा फायदा देशाला होणे अपेक्षित आहे. पण आर्थिक वाढीचे हे फायदे समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचत नसतील तर केवळ जीडीपीच्या वाढीला सर्वसमावेशक विकास कसे म्हणायचे? बोटावर मोजण्याइतक्या भांडवलदारांच्या संपत्तीत प्रचंड वाढ होत असेल, श्रीमंत अधिक श्रीमंत होत असतील आणि दुसरीकडे सामान्य माणसाचे उत्पन्न, रोजगार आणि क्रयशक्ती संकटात असेल तर हा विकास कोणत्या मापाने मोजायचा? आज देशात संपत्तीचे केंद्रीकरण हा गंभीर प्रश्न बनला आहे. अर्थव्यवस्थेची गाडी वेगाने धावत असल्याचे सांगितले जाते; परंतु त्या गाडीचा प्रवास कोणासाठी सुखकर आहे, याचाही विचार करावा लागेल. एका बाजूला मोठमोठ्या उद्योगसमूहांची संपत्ती दिवसेंदिवस वाढताना दिसते, तर दुसऱ्या बाजूला छोटा व्यापारी, शेतकरी, कामगार आणि मध्यमवर्गीय कुटुंब आपल्या उत्पन्नातून वाढत्या खर्चाचा मेळ घालण्याचा प्रयत्न करीत आहे. घरभाडे, शिक्षण, आरोग्य, अन्नधान्य आणि इतर जीवनावश्यक खर्च वाढत असताना हातात उरणारा पैसा कमी होत असेल तर सामान्य नागरिकाला जीडीपीच्या वाढीचा आनंद कसा वाटणार? सर्वांत मोठा प्रश्न रोजगाराचा आहे. जीडीपी वाढत आहे, देशाच्या विकासाची गती वाढत आहे, असे सांगितले जाते; मग बेरोजगारीची समस्या का कायम आहे? शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या लाखो तरुणांसमोर रोजगाराचे पुरेसे पर्याय का निर्माण होत नाहीत? पदवी हातात असूनही तरुणांना कमी पगाराच्या नोकऱ्यांसाठी संघर्ष का करावा लागतो? रोजगाराच्या संधी निर्माण न करता केवळ अर्थव्यवस्थेचा आकार वाढवला तर त्या वाढीचा उपयोग काय? याच प्रश्नांची उत्तरे सत्ताधाऱ्यांनी जनतेला द्यायला हवीत. 'जीडीपी वाढला', 'भारत जगातील मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये पुढे गेला', 'भारत महासत्तेकडे वाटचाल करीत आहे', एवढे सांगून भागणार नाही. महासत्ता होण्याचे स्वप्न निश्चितच देशाने पाहावे; पण त्या स्वप्नात सामान्य नागरिकाचा सहभाग आणि त्याचा आर्थिक वाटा किती आहे, हेही स्पष्ट झाले पाहिजे. महासत्तेच्या मार्गावर चालताना एखाद्या कुटुंबाच्या घरातील चूल विझत असेल, तर त्या प्रगतीचा अर्थ पुन्हा तपासावा लागेल.मात्र प्रश्न उपस्थित करून थांबणे पुरेसे नाही; त्यावर ठोस उपाययोजनाही आवश्यक आहेत. सरकारने जीडीपी वाढीबरोबर रोजगारनिर्मितीला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. श्रमप्रधान उद्योगांना प्रोत्साहन देऊन उत्पादन क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करणे गरजेचे आहे. लघु, सूक्ष्म आणि मध्यम उद्योगांना स्वस्त कर्ज, बाजारपेठ आणि तंत्रज्ञानाची उपलब्धता करून दिल्यास रोजगाराची मोठी दारे उघडू शकतात. सरकारी योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतो आहे की नाही, याची नियमित तपासणी झाली पाहिजे.शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणे हाही महत्त्वाचा उपाय आहे. शेतमालाला योग्य दर, साठवणूक व प्रक्रिया उद्योगांची उभारणी, सिंचनाच्या सुविधा आणि शेतीपूरक व्यवसायांना प्रोत्साहन दिल्यास ग्रामीण भागातील उत्पन्न वाढू शकते. त्याचबरोबर शिक्षणव्यवस्थेत केवळ पदवी देण्याऐवजी रोजगाराभिमुख कौशल्यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. उद्योगांना ज्या कौशल्यांची गरज आहे त्यानुसार प्रशिक्षणाची व्यवस्था केली तर शिक्षित बेरोजगारीचे प्रमाण कमी करता येईल.संपत्तीचे केंद्रीकरण कमी करण्यासाठी करव्यवस्थेत अधिक न्याय्यपणा आणणे, सार्वजनिक आरोग्य व शिक्षणावर पुरेशी गुंतवणूक करणे आणि सामाजिक सुरक्षेची व्याप्ती वाढवणे आवश्यक आहे. विकासाचा लाभ समाजातील तळाच्या घटकांपर्यंत पोहोचला तरच आर्थिक विषमता कमी होईल.त्याचबरोबर देशाच्या विकासाचे मोजमाप केवळ जीडीपीवर न करता रोजगार, प्रतिव्यक्ती उत्पन्न, गरिबी, विषमता, शिक्षण, आरोग्य आणि जीवनमान या निकषांवरही केले पाहिजे. सरकारने दरवर्षी 'जीडीपी वाढला' एवढे न सांगता त्या वाढीमुळे किती रोजगार निर्माण झाले आणि सामान्य नागरिकाचे जीवन किती सुधारले, याचा स्वतंत्र अहवाल जनतेसमोर ठेवला पाहिजे.विकास म्हणजे केवळ मोठे महामार्ग, उंच इमारती, मोठे उद्योग किंवा वाढता जीडीपी नव्हे. विकास म्हणजे सन्मानजनक रोजगार, वाढते उत्पन्न, परवडणारे शिक्षण आणि आरोग्य, सुरक्षित भविष्य आणि आर्थिक स्थैर्य. विकासाचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला तरच त्याला खऱ्या अर्थाने विकास म्हणता येईल.आज सर्वसामान्यांच्या मनात निर्माण झालेल्या या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. जीडीपीचा आकडा किती मोठा झाला यापेक्षा त्या आकड्यामागे किती भारतीयांचे जीवन सुधारले, हा खरा कस आहे. श्रीमंत अधिक श्रीमंत होत असतील आणि गरीब अधिक गरिबीच्या खाईत लोटला जात असेल तर त्या वाढीला विकास म्हणायचे का?, हा प्रश्न सरकारला टाळता येणार नाही. जीडीपीचा आकडा देशाच्या आर्थिक प्रगतीची दिशा दाखवू शकतो; पण त्या दिशेने चालताना सामान्य माणूस मागे तर पडत नाही ना, हे पाहणे त्याहून महत्त्वाचे आहे. विकासाची गती मोजण्यापूर्वी विकासाचा लाभ कोणाला मिळतोय, हे मोजण्याची वेळ आता आली आहे. जीडीपीची वाढ आकड्यांत दिसते; पण खरा विकास तोच, जो सामान्य माणसाच्या घरात समृद्धी, रोजगार आणि सुरक्षित भविष्य घेऊन येतो.**

# आता हारतुरे पुरे;शिक्षकाला शिकवू द्या!

५ सप्टेंबर जवळ आला की शिक्षक अचानक आठवतात. शाळांच्या भिंतींवर शुभेच्छांचे फलक लागतात, विद्यार्थ्यांच्या हातात फुले येतात आणि व्यासपीठांवर गुरूचे महत्त्व सांगणारी भाषणे रंगतात. काही तास शिक्षकाचा गौरव होतो; मात्र सोहळा संपताच तो पुन्हा आदेश, अहवाल, प्स, सर्वेक्षणे, अभियान आणि प्रशासकीय जबाबदाऱ्यांच्या चक्रात अडकतो. म्हणूनच यंदाच्या शिक्षक दिनी एक अस्वस्थ करणारा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहेशिक्षकाला त्याचे मूलभूत काम, म्हणजे शिकवणे, पुरेशा वेळेत आणि स्वातंत्र्याने करू दिले जाते आहे का?



शिक्षक हा शिक्षणव्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. मात्र निवडणुका, जनगणना, मतदार याद्या, विविध सर्वेक्षणे, सरकारी अभियान, ऑनलाइन नोंदी, अहवाल, बैठका, प्रशिक्षण आणि दस्तऐवजीकरण अशा अनेक जबाबदाऱ्यांचा भार त्याच्यावर वाढत आहे. मनुष्यबळाची गरज भासली की शिक्षक सहज उपलब्ध होतो; पण त्याचा अध्यापनाचा वेळ कमी होतो. परिणामी शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होणे अपरिहार्य ठरते.

शिक्षणाची गुणवत्ता केवळ निकाल, टक्केवारी किंवा गुणवंत विद्यार्थ्यांच्या संख्येने ठरत नाही. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील अर्थपूर्ण संवादासाठी मिळणारा वेळ हा तिचा महत्त्वाचा आधार आहे. प्राथमिक स्तरावर बालकाच्या शिकण्याची गती, भीती, कुतूहल आणि आत्मविश्वास समजून घेण्यासाठी शिक्षकाचा सातत्यपूर्ण सहवास आवश्यक असतो. माध्यमिक स्तरावर किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या करिअर, डिजिटल जग, सामाजिक दबाव आणि भावनिक प्रश्नांना दिशा देण्यासाठी शिक्षक मार्गदर्शक ठरतो. उच्च शिक्षणात तर अध्यापनाबरोबर वाचन, संशोधन, चिंतन आणि ज्ञाननिर्मितीसाठी प्राध्यापकाला पुरेसा अवकाश हवा.

**संतोष कुलकर्णी**

विडंबना अशी की व्यवस्थात्मक अडचणींचे परिणाम मात्र शिक्षकांच्या कामगिरीवर मोजले जातात. निकाल घसरला, उपस्थिती कमी झाली किंवा विद्यार्थ्यांची गुणवत्ता अपेक्षेप्रमाणे राहिली की शिक्षकांवर प्रश्न उपस्थित होतात; परंतु त्याला अध्यापनासाठी प्रत्यक्ष किती वेळ मिळाला, वर्गातील विद्यार्थीसंख्या किती आहे, सुविधा काय आहेत आणि किती गैरशैक्षणिक कामे सोपवली आहेत, याचा विचार कितीदा केला जातो? याचा अर्थ शिक्षकांवर कोणतीही अतिरिक्त जबाबदारी नसावी असा नाही. निवडणूक किंवा जनगणनेसारखी राष्ट्रीय कर्तव्ये अपवादात्मक परिस्थितीत आवश्यक आहेत. पण अपवादांचे नियमित व्यवस्थेत रूपांतर होणे धोकादायक आहे. शाळा प्रत्येक सरकारी योजनेचे अंमलबजावणी केंद्र आणि शिक्षक प्रत्येक प्रशासकीय कामासाठी उपलब्ध मनुष्यबळ ठरू नये.

शिक्षक दिनाचा खरा अर्थ हारतुरे, पुष्पगुच्छ आणि भाषणांमध्ये नाही. शिक्षकाला अध्यापनासाठी वेळ, शैक्षणिक स्वायत्तता, दर्जेदार प्रशिक्षण आणि सन्मानाचे कामकाजाचे वातावरण देण्यात आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण हवे असेल, तर शिक्षकाला केवळ गौरवून चालणार नाही; त्याला शिकवण्यासाठी मोकळे करावे लागेल. म्हणून यंदा शिक्षक दिनी एकच प्रश्न विचारूयागुरूचा गौरव केला; पण त्याला ज्ञानाचा दिवा प्रज्वलित करण्यासाठी वेळ दिला का?




# वंदे मातरम्च्या अपमानावरुन राजकारण;राष्ट्रगीताच्या सन्मानाचा प्रश्न मात्र राजकीय चौकटीपलीकडचा

वंदे मातरम् हे केवळ दोन शब्दांचे गीत नाही. स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात या गीताने भारतीयांच्या मनात स्वाभिमान, राष्ट्रप्रेम आणि ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढण्याची प्रेरणा निर्माण केली. त्यामुळे वंदे मातरम्चा अपमान झाल्याचा आरोप समोर आल्यानंतर देशात राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू होणे स्वाभाविक असले, तरी या विषयाकडे केवळ पक्षीय राजकारणाच्या चष्म्यातून पाहणे निश्चितच योग्य नाही.

आज एक पक्ष दुसऱ्या पक्षावर वंदे मातरम्चा अपमान केल्याचा आरोप करतो, तर विरोधक त्याला राजकीय मुद्दा बनवून जनतेच्या भावनांना भडकवण्याचा प्रयत्न असल्याचे सांगतात. सत्ताधारी असो वा विरोधक राष्ट्रभावनेशी निगडित प्रतीकांचा वापर राजकीय हत्यार म्हणून करण्याची प्रवृत्ती लोकशाहीच्या आरोग्यासाठी चिंताजनक आहे. राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज किंवा स्वातंत्र्यलढ्याच्या प्रतीकांचा सन्मान हा कोणत्याही एका राजकीय पक्षाचा किंवा विचारधारेचा ठेवा असू शकत नाही. वंदे मातरम्चा इतिहास पाहिला तर त्यामागे भारतीय स्वातंत्र्यलढ्याची दीर्घ आणि भावनिक परंपरा आहे. असंख्य स्वातंत्र्यसैनिकांनी या घोषणेने प्रेरित होऊन संघर्ष केला. त्यामुळे एखाद्याच्या कृतीमुळे किंवा वक्तव्यामुळे या गीताचा अवमान झाला असेल, तर त्याची वस्तुनिष्ठ चौकशी झाली पाहिजे. नेमके काय बोलले गेले, कोणत्या संदर्भात बोलले गेले, त्याचा उद्देश काय होता आणि प्रत्यक्षात काय घडले. या सर्व बाबी तपासल्याशिवाय केवळ राजकीय आरोपांच्या आधारे निष्कर्ष काढणे धोकादायक आहे.

विशेषतः सोशल मीडियाच्या युगात एखाद्या वक्तव्याचा छोटासा व्हिडिओ, अर्धवट विधान किंवा संदर्भहीन चित्रफीत क्षणार्धात देशभर पसरते. त्यातून गैरसमज, संताप आणि सामाजिक ध्रुवीकरण वाढण्याची शक्यता असते. म्हणूनच राष्ट्रप्रेमाच्या नावाखाली भावनांना पेटविण्याऐवजी सत्य काय आहे, हे समोर आणण्याची जबाबदारी राजकीय पक्षांइतकीच माध्यमांची आणि समाजाचीही आहे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे वंदे मातरम्चा सन्मान आणि त्याचा राजकीय वापर यामध्ये स्पष्ट सीमारेषा असली पाहिजे. एखाद्या नागरिकाने राष्ट्रगीताचा किंवा राष्ट्रीय प्रतीकाचा जाणूनबुजून अवमान केला असेल, तर कायदा आपले काम करेल. मात्र प्रत्येक मतभेदाला देशद्रोहाचे स्वरूप देणे आणि प्रत्येक राजकीय विरोधाला राष्ट्रविरोधी ठरवणे ही लोकशाहीसाठी धोकादायक प्रवृत्ती आहे. आज देशाला वंदे मातरम्वरून भांडणाऱ्या राजकारणापेक्षा वंदे मातरम्च्या भावनेतून देश जोडणारे राजकारण आवश्यक आहे. बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांचे प्रश्न, शिक्षण, आरोग्य, अंतर्गत सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांसारखे अनेक मूलभूत प्रश्न देशासमोर उभे आहेत. अशा वेळी राष्ट्रभक्तीच्या प्रतीकांवरून राजकीय संघर्ष निर्माण करून जनतेचे लक्ष मूळ प्रश्नांपासून दूर नेणे कोणाच्याही हिताचे नाही. वंदे मातरम्चा खरा सन्मान केवळ घोषणांनी होत नाही; तो देशातील प्रत्येक नागरिकाच्या सन्मानाचे रक्षण करण्यात, संविधानाच्या मूल्यांचा आदर करण्यात, विविधतेत एकता टिकवण्यात आणि देशाच्या प्रगतीसाठी प्रामाणिकपणे काम करण्यात आहे. राजकीय पक्षांनी या विषयाचे गांभीर्य समजून घेतले पाहिजे. वंदे मातरम्चा अपमान झाला असेल तर त्याची चौकशी करा, दोषी असेल तर कायद्यानुसार कारवाई करा; पण राष्ट्रभावनेला पक्षीय राजकारणाच्या रणांगणात ओढू नका. कारण वंदे मातरम् कोणत्याही एका पक्षाचे नसून संपूर्ण भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृतीशी जोडलेले राष्ट्रीय भावविश्व आहे.

**ॲड.संजय रुईकर**

आज गरज आहे ती वंदे मातरम्च्या नावावर देश विभागण्याची नव्हे, तर वंदे मातरम्च्या भावनेने देश एकत्र आणण्याची. राष्ट्रप्रेम घोषणांमध्ये नव्हे, तर कृतीत दिसले पाहिजे. तेव्हाच या पवित्र गीताचा खरा सन्मान होईल.

# ऊसावरील'पायरीला'किडीचे वेळीच व्यवस्थापन करावे

## जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांचे आवाहन

नांदेड/प्रतिनिधी-ऊस पिकाच्या वाढीवर व उत्पादनावर परिणाम करणाऱ्या पायरीला अथवा पानावरील तुडतुडा या रसशोषक किडीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता लक्षात घेता शेतकऱ्यांनी वेळीच सतर्क होऊन पिकाची नियमित पाहणी करणे आवश्यक आहे. पायरीला किडीची पिल्ले व प्रौढ कीटक पानातील रस शोषत असल्याने पाने पिवळसर पडतात. तसेच किडीमुळे साचणाऱ्या चिकट मधासारख्या पदार्थावर काळी बुरशी वाढल्याने प्रकाशसंश्लेषणाची प्रक्रिया बाधित होऊन ऊसाची वाढ व उत्पादन घटू शकते. त्यामुळे प्रादुर्भावाची सुरुवातीची लक्षणे दिसताच रासायनिक नियंत्रणाची घाई न करता एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.



शेतकऱ्यांनी आठवड्यातून किमान एकदा पिकाची पाहणी करावी. विशेषतः पानांच्या खालच्या बाजूस पायरीलाची पिल्ले, प्रौढ कीटक व अंडीपुंज तपासावेत. शेताच्या बांधावरील तसेच दाट वाढलेल्या उसातील प्रादुर्भावाची प्रथम तपासणी करावी. पिकामध्ये प्रादुर्भा-वाची सुरुवात दिसताच आवश्यक नियंत्रणाच्या उपाययोजना कराव्यात.

सर्वेक्षण व देखरेख : पायरीला किडीच्या निरीक्षणासाठी पिकाच्या शेंड्यापासून १५ सें.मी. उंचीवर प्रति ५ एकर एक प्रकाश सापळा लावावा. हे सापळे सायंकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत सुरू ठेवावेत. तसेच शेतातील वेगवेगळ्या ठिकाणच्या १० ऊसावरील २० पानांची पाहणी करून पिल्ले, प्रौढ कीटक व अंडीपुंजांची संख्या नोंदवावी. प्रति पान ३ ते ५ पिल्ले किंवा प्रौढ अथवा १ अंडीपुंज आढळल्यास ती आर्थिक नुकसान पातळी मानावी.

एकात्मिक व्यवस्थापन : ऊसाचे शेत एकदल तणांपासून स्वच्छ ठेवावे. उसाच्या खालची वाळलेली पाने (पाचट) काढून टाकावीत, कारण त्यावर पायरीलाची अंडी असू शकतात. नत्राचा अतिरेकी वापर टाळून पिकास योग्य प्रमाणात स्फुरद व पालाश द्यावे. पानांच्या मागील बाजूस आढळणारे पांढऱ्या कापसासारखे अंडीपुंज हाताने गोळा करून नष्ट करावेत. शक्य असल्यास सकाळच्या वेळी उसाची पाने हलवून प्रौढ व पिल्ले खाली पाडून नष्ट करावीत. पक्व झालेला ऊस शक्य तितक्या लवकर कापून घ्यावा.

जैविक नियंत्रणाला प्राधान्य : पायरीला किडीच्या नियंत्रणासाठी इपिरिकॅनिया मेलॅनोल्युका या नैसर्गिक शत्रूचा वापर करावा. शेतात इपिरिकॅनियाचा प्रादुर्भाव आढळल्यास रासायनिक कीटकनाशकांची फवारणी करू नये. इपिरिकॅनियाचे ४ हजार ते ५ हजार कोश किंवा ४ ते ५ लाख अंडी प्रति एकरी सोडावीत. जास्त परजीवीकरण झालेल्या शेतातून इपिरिकॅनिया गोळा करून कमी परजीवीकरण झालेल्या शेतात सोडावे. तसेच ढालकिडे, लेसविंग, सिरफिड माशी व कोळी यांसारख्या नैसर्गिक शत्रूंचे संरक्षण करावे.

नैसर्गिकरित्या मेटारायझियम ॲनिसोपली या बुरशीने बाधित झालेल्या पायरीलाचा वापर जैविक नियंत्रणासाठी करता येतो. अशा बाधित प्रौढ पायरीला गोळा करून इतर बाधित शेतात सोडावेत. इपिरिकॅनियाचे जिवंत कोश व अंडीपुंज असलेली पाने तसेच जिवंत कोश असलेले पाचट जाळू नये; ते पायरीला प्रादुर्भाव असलेल्या शेतात सोडावे.

रासायनिक नियंत्रण : जैविक शत्रू उपलब्ध नसतील आणि पायरीला किडीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा अधिक असेल, तरच शिफारशीनुसार रासायनिक कीटकनाशकांचा वापर करावा. त्यासाठी क्लोरपायरीफॉस २० टक्के ईसी १५०० मिली प्रति हेक्टर ५०० ते १००० लिटर पाण्यात किंवा ॲसिफेट ५० टक्के + इमिडाक्लोप्रिड १.८० टक्के एसपी २५०० ग्रॅम प्रति हेक्टर ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

पायरीला कीड दिसताच रासायनिक कीटकनाशकांच्या फवारणीची घाई करू नये. प्रथम पिकाचे निरीक्षण करून अंडीपुंज व बाधित पाने नष्ट करावीत, नैसर्गिक शत्रूंचे संवर्धन करावे आणि जैविक नियंत्रण पद्धतीचा अवलंब करावा. प्रादुर्भाव तीव्र झाल्यासच शिफारस केलेल्या कीटकनाशकांचा वापर करावा. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

## मोठ्या भावाने आमच्या वाट्याला येऊ नये;आम्ही आमचा हक्क मागतो
# उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ १३ रोजी नांदेडमध्ये जनआक्रोश मोर्चा

माहूर/प्रतिनिधी- आरक्षणाच्या बाबतीत आजवर समता, न्याय आणि बंधुत्वाच्या भावनेने मोठ्या भावाने काम केले असते, तर आमच्या लेकरा-बाळांसाठी मोर्चा काढण्याची वेळच आली नसती. आम्ही कुणाचा हक्क हिरावून घेण्यासाठी नव्हे, तर आमच्या वाटचाचा हक्क मागण्यासाठी रस्त्यावर उतरत आहोत. त्यामुळे मोठ्या भावाने आमच्या वाट्याला येऊ नये, असा स्पष्ट इशारा किनवटचे माजी नगराध्यक्ष के. मूर्ती यांनी दिला.

अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ १३ सप्टेंबर रोजी नांदेड येथे होणाऱ्या जनआक्रोश मोर्चाच्या नियोजनासाठी माहूर येथील हॉटेल आदिशक्ती येथे दि.२ सप्टेंबर रोजी बैठक घेण्यात आली. यावेळी के. मूर्ती, नारायण सांगळे, गंगाधर तोटरे, मारुती गोटमुकले, नारायणराव माडपेल्लीवार, देवानंद भांडवले यांच्यासह समाजबांधवांनी उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ भूमिका मांडली. यावेळी बोलताना के. मूर्ती म्हणाले की, १९८७ पासून २०२३ पर्यंत आरक्षणाचा लाभ काही घटकांनाच मोठ्या प्रमाणावर मिळाला; मात्र आता वंचित समाजातील मुले शिक्षित झाली असून त्यांनाही प्रगतीची संधी मिळाली पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाने वंचित घटकांना न्याय देण्यासाठी अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा मार्ग मोकळा केला असून त्याची अंमलबजावणी करण्याचे अधिकार राज्य सरकारला आहेत. त्यामुळे शासनाने उपवर्गीकरणाची अंमल-बजावणी तातडीने करावी, अन्यथा आंदोलनाची धार कायम ठेवावी लागेल, असा इशाराही त्यांनी दिला. मातंग समाजाचा मोठा भाऊ मानल्या जाणाऱ्या बौद्ध समाजातील काही नेत्यांकडून होत असलेल्या कथित असभ्य टीकेबाबतही बैठकीत नाराजी व्यक्त करण्यात आली. यावर के. मूर्ती यांनी, आमचा कुणालाही विरोध नाही. आमचे भांडण शासनासोबत आहे. आम्हाला आमचा हक्क हवा आहे, असे स्पष्ट केले. दरम्यान, १३ सप्टेंबरच्या जनआक्रोश मोर्चाबाबत समाजबांधवांमध्ये जनजागृती करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या पोस्टरचे यावेळी विमोचन करण्यात आले. १३ सप्टेंबरला घराला कुलूप लावून मोठ्या संख्येने नांदेडच्या मोर्चात सहभागी व्हावे आणि उपवर्गीकरणाच्या मागणीला बळ द्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. बैठकीच्या यशस्वी आयोजनासाठी अनिल माडपेल्लीवार, देवानंद भांडवले, मिलिंद चांदणे, दत्ता आठवले, गजानन जोगदंड, तुषार आमटे, ज्ञानेश्वर पतंगे, इंद्रजीत नेवारे, भीमाशंकर सूर्यवंशी, आकाश पतंगे, दशरथ उबाळे, गणेश लोंढे, किरण टाकळीकर, सतीश उमाप, कमलेश जोगदंड यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

# तीन महिन्यांपासून कंत्राटी कामगारांचे पगार रखडले
## धर्माबाद न.प.च्या कामगारांवर उपासमारीची वेळ

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद नगरपरिषदेत स्वच्छतेसह विविध विभागांत सेवा देणाऱ्या कंत्राटी कामगारांचे वेतन गेल्या तब्बल तीन महिन्यांपासून रखडल्याची अत्यंत गंभीर बाब समोर आली आहे. नगरपरिषदेत सध्या अधिकृत कंत्राटदार नसल्याचे तांत्रिक कारण पुढे करत प्रशासनाकडून हे वेतन रोखण्यात आले असून, यामुळे कामगारांच्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे.

धर्माबाद पालिकेतील कंत्राटदाराची मुदत संपल्यामुळे सध्या कंत्राटदार कार्यरत नाही. मात्र, कंत्राटदार नसतानाही शहरातील स्वच्छता, पाणीपुरवठा आणि इतर अत्यावश्यक सेवा विस्कळीत होऊ नये म्हणून हे कामगार गेल्या तीन महिन्यांपासून प्रामाणिकपणे आपली कर्तव्ये बजावत आहेत. नियम सांगतो की, कंत्राटदार नसताना मुख्य नियोक्ता म्हणून नगरपरिषद प्रशासनाने कामगारांचे वेतन थेट रोजंदारी किंवा मानधनावर करणे बंधनकारक आहे. मात्र, प्रशासकीय दिरंगाई आणि तांत्रिक मंजुरीच्या नावाखाली कामगारांना हक्काच्या वेतनापासून वंचित ठेवले जात आहे. गेल्या ९० दिवसांपासून एकही रुपया न मिळाल्याने कामगारांचे घरखर्च, मुलांची फी आणि औषधोपचाराचा खर्च कसा भागवावा, कामगार कंत्राटदाराविनाही सेवेत, मग पगार का रोखला? असा संतप्त सवाल कामगार करत आहेत. किमान वेतन व कामगार कायद्याचे थेट उल्लंघन महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाच्या नियमांनुसार, प्रत्येक कंत्राटी किंवा रोजंदारी कामगाराला दरमहा ७ तारखेच्या आत वेतन मिळणे हा त्यांचा कायदेशीर हक्क आहे. मात्र, धर्माबाद नगरपरिषदेत सलग तीन महिने पगार न देऊन कामगार कायद्याचे थेट उल्लंघन केले जात आहे. कंत्राटदार नाही या सबबीखाली पालिका प्रशासन आपली मुख्य नियुक्ता म्हणून असलेली जबाबदारी झटकू शकत नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे.

# वीज मीटर फोडून छेडछाड प्रकरणी ५३ जणांवर पोलीस कारवाई

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यांचा समावेश असणाऱ्या नांदेड परिमंडलात महावितरणने वीज चोरांविरूध्द कँबर कसली आहे. सप्टेबंर २०२६ मधील केवळ पहिल्या तीनच दिवसांत परभणी जिल्ह्यात मीटरमध्ये छेडछाड करून विजेची चोरी केली जात असल्याची ७० प्रकरणे महावितरणच्या तपासात उघडकीस आली आहेत. ७० पैकी ५३ जणांविरूध्द परभणी पोलीसांनी गुन्हेही दाखल केले आहेत.

अनधिकृतपणे विशेषत: मीटरला छेडछाड करून चोरून वीज वापराची प्रकरणे महावितरणने गांभीर्याने घेतली आहेत. संपूर्ण परिमंडलात विशेष पथके निर्माण करून वीज चोरांचा शोध घेण्यात येत आहे. वीज चोरी प्रकरणी भारतीय विद्युत कायदा २००३ व २००५ मधील कलम १३५ व १३८ नुसार पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात येवून केवळ वीज वापर व दंडाचीच रक्कम भरून घेतली जात असून तडजोडीची रक्कम भरून न घेता त्यासंबधीचे खटले न्यायालयात चालवली जाणार आहेत. त्यामुळे मीटरला छेडछाड करून वीज चोरीला हातभार लावणाऱ्यांचीही नावे उघडकीस येणार आहेत. परिणामी, मीटर धारकांसोबतच मीटरमध्ये छेडछाड करून देणाऱ्यांविरूध्द भारतीय विद्युत कायदा २००५ मधील कलम १३८ नुसार कारवाई होणे शक्य होणार आहे. पुढील काळातही सातत्यपुर्वक वीज चोरी विरूध्दची मोहिम राबविण्यात येणार असल्याचे महावितरण तर्फे स्पष्ट करण्यात येत आहे.




बंजारा समाजाच्या तिज महोत्सव कार्यक्रमाला सुरुवात झाली असून या महोत्सवात पारंपारिक नृत्य करतांना आ.श्रीजया चव्हाण, पुसदच्या नगराध्यक्षा मोहिनी नाईक, महापौर कविता मुळे, शितल राठोड, डॉ.ज्योत्सना राठोड, राजश्री पाटील, संध्याताई कल्याणकर, बेबीताई नाईक, डॉ.निकिता चव्हाण, डॉ.आशा चव्हाण, सीमा राठोड, देवकाबाई राठोड, माला पवार, वर्षा चव्हाण, डॉ.आश्विता पवार, डॉ.शिल्पा चव्हाण, डॉ.माया पवार यांच्यासह इतर महिला दिसत आहेत.

# मुखेड बसस्थानकात सिमेंटच्या बेंचेसचा लोकार्पण सोहळा

मुखेड/प्रतिनिधी-प्रवाशांना बसस्थानकात बसण्यासाठी चांगली सुविधा उपलब्ध व्हावी या सामाजिक बांधिलकीतून सुप्रभात मित्र मंडळ, मुखेड यांच्या वतीने मुखेड बसस्थानकाच्या प्रांगणात सिमेंटचे बेंचेस बसविण्यात आले. या बेंचेसचा लोकार्पण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रभात मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा मुखेड भूषण डॉ. दिलीपराव पुंडे होते, तर उद्घाटक म्हणून आगार प्रमुख सुभाषराव पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सुप्रभात मित्र मंडळाचे अध्यक्ष लक्ष्मण पत्तेवार, सचिव जीवन कवटीकवार, कार्याध्यक्ष अशोक कोत्तावार, संघटक उत्तम कुलकर्णी, डॉ. एम. जे. इंगोले, डॉ. आर. जी. स्वामी, नारायणराव बिलोलीकर, नंदकुमार मडगुलवार आदी मान्यवर उपस्थित होते. लक्ष्मण पत्तेवार व सुभाषराव पवार यांच्या हस्ते श्रीफळ फोडून लोकार्पण सोहळा पार पडला. यावेळी प्रवाशाचा सन्मान करून त्यांच्याप्रतीही आदर व्यक्त करण्यात आला. अध्यक्षीय समारोप करताना मुखेड भूषण डॉ. दिलीपराव पुंडे म्हणाले की, एसटी महामंडळ ही महाराष्ट्राच्या जनजीवनाशी जोडलेली लाल परी असून, काळानुसार तिचे रूप बदलत गेले आहे. शिवशाही, शिवाई, स्लीपर कोच अशा आधुनिक बससेवांच्या माध्यमातून एसटी प्रवाशांना अधिक आरामदायी व सुरक्षित प्रवास देण्याचा प्रयत्न करीत आहे. आजच्या काळात प्रवाशांची सुरक्षा आणि कर्मचाऱ्यांचे आरोग्य यांना सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे. सुरक्षा सप्ताहाच्या माध्यमातून सुरक्षित प्रवासाबाबत जनजागृती केली जाते; मात्र सुरक्षा ही केवळ सप्ताहापुरती मर्यादित न राहता ती दैनंदिन कार्यसंस्कृतीचा भाग झाली पाहिजे.

# पतीने केला पत्नीचा दोरीने गळा आवळून खून

नांदेड/प्रतिनिधी- ऊसतोडीला जाण्याच्या क्षुल्लक कारणावरुन पतीने पत्नीचा दोरीने गळा आवळून खून केल्याची घटना ३ सप्टेंबर रोजी भोकर शहरातील बटाळा रोडवर घडली.

याबाबत माहिती अशी की, आरोपी हनमंत रमेश भोसले (३३) व त्याची पत्नी ममता हनमंत भोसले (३१) हे भोकर येथे बटाळा रोडवर राहत होते. ३ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजता ऊसतोडणीच्या कामाला जाण्यावरुन दोघांचे भांडण झाले. या वादाच्या रागामध्ये हनमंत रमेश भोसले याने आपली पत्नी ममता भोसले हिचा दोरीने गळा आवळून खून केला. मयत महिलेच्या भावाने दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपी हनमंत रमेश भोसले याच्या विरुध्द खुनाचा गुन्हा दाखल करुन आरोपीस अटक करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास पो. नि. विश्वंभर पल्लेवाड यांच्या मार्गदर्शना-खाली सपोनि बाबासाहेब कांबळे हे करीत आहेत.

# अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यशाळा

नांदेड/प्रतिनिधी-डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे व येथील सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ व सुधारित अधिनियम २०१६ च्या प्रभावी अंमलबजावणीबाबत जिल्हास्तरीय एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन सोमवार, दि.७ सप्टेंबर रोजी स.११ वा. नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथील सभागृहात करण्यात आले आहे.

या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी राहणार असून पोलीस उपमहानिरीक्षक, पोलीस अधीक्षक तसेच पोलीस अधीक्षक (ना.ह.स. विभाग) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. पोलीस विभागातील अधिकारी-कर्मचारी तसेच अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या अंमलबजावणीशी संबंधित विविध शासकीय यंत्रणांमधील अधिकारी व कर्मचारी कार्यशाळेत सहभागी होणार आहेत.या कार्यशाळेस पुणे येथील बार्टीच्या प्रशिक्षण विभागाचे विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड तसेच येथील ॲड. डॉ. भीमराव हटकर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याबाबत नागरिकांमध्ये माहिती व जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यशाळेस जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त शिवानंद मिनगीरे यांनी केले आहे.



राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष हरदीपसिंघ गिल यांनी नांदेड येथील दौऱ्यात सुप्रसिद्ध तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारा येथे गुरुग्रंथ साहिब यांचे दर्शन घेतले. बाबा जीवनसिंघ यांचे जन्मदिवस साजरा करण्यासाठी अमृतसर येथून विशेष रेल्वेने आणलेल्या सर्व संगतसोबत श्री. गिल यांनी तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वाराचे माथा टेकून दर्शन घेतले. यावेळी त्यांचा पारंपारिक पद्धतीने शाल, श्रीफळ देवून सन्मान करण्यात आला. याप्रसंगी सुरेश लोट, स.अवतारसिंघ पहरेदार आदी.

## कौठ्याच्या सुपुत्राची मलेशियात गरुडझेप;
# शिवशंकर बिडवे यांना सलग पाचव्यांदा 'स्टार पुरस्कार'

कंधार/प्रतिनिधी-कंधार तालुक्यातील कौठा येथील रहिवासी आणि नामांकित सन फार्मा कंपनीत कार्यरत असलेले युवा शिवशंकर बिडवे यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या कामगिरीचा डंका वाजवला आहे. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत कंपनीच्या वतीने मलेशिया येथे आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना सलग पाचव्यांदा प्रतिष्ठेच्या 'स्टार पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले.

त्यांच्या या यशाने कंधार तालुक्यासह संपूर्ण नांदेड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.शिवशंकर बिडवे हे मागील काही वर्षांपासून औषध निर्माण क्षेत्रातील अग्रगण्य 'सन फार्मा' कंपनीत आपली सेवा देत आहेत. आपल्या कामातील अचूकता, कल्पकता आणि उत्कृष्ट व्यवस्थापन कौशल्याच्या जोरावर त्यांनी कंपनीच्या प्रगतीत मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या याच सातत्यपूर्ण आणि उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करण्यासाठी मलेशियात दि.३ सप्टेंबर २०२६ रोजी विशेष आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हस्ते शिवशंकर बिडवे यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. सलग पाच वर्षे असा गौरव मिळवणारे ते कंपनीतील मोजक्या कर्मचाऱ्यांपैकी एक ठरले आहेत. शिवशंकर बिडवे यांच्या या आंतरराष्ट्रीय यशाची बातमी समजताच त्यांच्या मूळ गावी म्हणजेच कौठा (ता. कंधार) येथे ग्रामस्थांनी आनंदोत्सव साजरा केला. एका ग्रामीण भागातील युवकाने आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर सातासमुद्रापार मिळवलेले हे यश इतर ग्रामीण युवकांसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे.या यशाबद्दल शिवशंकर बिडवे यांच्यावर संजय देशमुख, गंगाधर हाते,संजय बिडवे, शिवानंद बिडवे, अतुल बिरादार, पत्रकार मित्र मोहम्मद सिकँदर सामाजिक आणि उद्योग क्षेत्रातून कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जि.प.कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या तज्ञ संचालकपदी एम.डी.ढगे पाटील


नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, नांदेडच्या तज्ञ संचालकपदी पंचायत समिती भोकर येथील ग्रामपंचायत अधिकारी एम.डी. ढगे पाटील यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. त्यांच्या प्रशासकीय व सहकार क्षेत्रातील अनुभवाचा पतसंस्थेच्या आगामी वाटचालीस निश्चितच फायदा होईल, असा विश्वास यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

नांदेड जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, नांदेडच्या कार्यालयात एम.डी.ढगे पाटील यांच्या तज्ञ संचालकपदी झालेल्या निवडीच्या निमित्ताने विशेष सत्कार व अभिनंदन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी पतसंस्थेचे पदाधिकारी, संचालक मंडळ, कर्मचारी तसेच विविध कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी पतसंस्थेचे अध्यक्ष अशोक कासारळीकर, सरचिटणीस पांडुरंग नागेश्वर, ज्येष्ठ संचालक आनंदा खंदारे (मामा), संचालक तथा ग्रामपंचायत संघटनेचे जिल्हाध्यक्ष अमृतराव शिंदे, संचालक तथा जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गजानन शिंदे, संचालक सौ. सुनीता बनसोडे, रवी कांबळे, शिवसांभ चेड्डू, पवन तलवारे, ग्रामपंचायत तांत्रिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष गुलाब वडजे, लिपिक वर्गीय संघटनेचे जिल्हाध्यक्ष कमल दर्डा, भास्करराव कापसे, सीतावार साहेब, पतसंस्थेचे व्यवस्थापक विवेक मोरे, कर्मचारी शिवदास मंगलवार तसेच गणेश किरकन आदी मान्यवर उपस्थित होते.

# कुंडलवाडीत मोफत नेत्र तपासणी उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद
## ४९ रुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया;१५ जणांवर नेत्रमांसवाढ शस्त्रक्रिया

कुंडलवाडी/प्रतिनिधी- नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई गजानन कोटलावार यांच्या पुढाकारातून एल. व्ही. प्रसाद नेत्र संस्थान, हैदराबाद, भोसले गोपाळराव पाटील नेत्र केंद्र, मुधोळ, मुक्तांगण सेवाभावी संस्था, धर्माबाद आणि कै. के. रामलू साहेब प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या मोफत नेत्र तपासणी व नेत्र शस्त्रक्रिया उपक्रमाला कुंडलवाडी परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

या उपक्रमांतर्गत आतापर्यंत ४९ गरजू रुग्णांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून, त्यांना मोफत कृत्रिम भिंग बसविण्यात आले आहे. तसेच १५ रुग्णांवर नेत्रमांसवाढीच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. दि.२५ ऑगस्ट रोजी आणखी तीन गरजू रुग्णांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली. या उपक्रमामुळे



आतापर्यंत एकूण ४९ नागरिकांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेचा, तर १५ नागरिकांना नेत्रमांसवाढ शस्त्रक्रियेचा मोफत लाभ मिळाला आहे. आर्थिक परिस्थितीमुळे डोळ्यांवरील उपचार पुढे ढकलणाऱ्या गरजू नागरिकांना या उपक्रमामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. कुंडलवाडीतील नागरिकांच्या आरोग्याला नेहमीच प्राधान्य राहील. यापुढेही नागरिकांच्या आरोग्यासाठी अशाच प्रकारचे आरोग्यदायी आणि जनहिताचे उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील, अशी ग्वाही नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई गजानन कोटलावार यांनी दिली. या उपक्रमासाठी उपनगराध्यक्षा सौ. नेहाताई शैलेश र्याकावार, सर्व नगरसेवक व नगरसेविका, भाजप मंडळ अध्यक्ष नरेश ठाकूरवार, मुक्तांगण सेवाभावी संस्था, धर्माबादचे प्रा. डॉ. गोविंद चौधरी तसेच कै. के. रामलू प्रतिष्ठानच्या सर्व कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभत आहे. गरजू नागरिकांना मोफत नेत्र उपचार उपलब्ध करून देणाऱ्या या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# किनवट आगाराला नवसंजीवनी;राजमाता जिजाऊच्या पाच बसेसचे लोकार्पण

## आणखी दहा बसेससाठी प्रयत्न-आ.केराम

किनवट/प्रतिनिधी-ज्य परिवहन महामंडळाकडून किनवट आगाराला देण्यात आलेल्या ५ राजमाता जिजाऊ बसेसचा आज (५ सप्टेंबर) सकाळी आ. भीमराव केराम यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा पार पडला.येत्या काळात किनवटचे बस स्थानक भव्य-दिव्य, सुसज्ज व वातानुकूलित निर्माण करण्याचा आपला प्रयत्न असून मुख्यमंत्री आणि परिवहन मंत्र्यांच्या संपर्कात असल्याचे आ.केराम यांनी सांगितले. किनवट व माहूर आगाराला प्रत्येकी पाच राजमाता जिजाऊ बसेस दिल्या आहेत. आणखी दहा बसेससाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले.

लोकार्पण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी आगार प्रमुख अशोक चव्हाण होते. दरम्यान त्यांनी आ.केराम यांच्या प्रयत्नामुळे नवीन बसेस मिळाल्या असून उत्पन्नाचा स्त्रोत वाढण्यासाठी त्यांचे मोलाचे योगदान लाभले असल्याचे अध्यक्ष समारोप प्रसंगी आभार व्यक्त केले. यावेळी माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, बाबुराव केंद्रे, नगरसेवक संतोष मरस्कोल्हे, नगरसेवक प्रशांत कोरडे, भाजपा शहर मंडळाध्यक्ष स्वागत आयनेनिवार, विश्वास कोल्हारीकर, बालाजी बामणे, अश्विन पवार, रमेश बद्दीवार, बी.एल.कागणे, गोकुळ भवरे, प्रमोद पोहुरकर, मधुकर अनेलवार, संतोष सिसले, दुर्गादास राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी बोलताना आ.केराम म्हणाले की, बस आगार हे आपल्या सर्वांची सार्वजनिक मालमत्ता आहे. या आगार परिसरात ज्यांनी ज्यांनी अतिक्रमण केले आहे त्यांनी स्वयंस्फूर्तीने अतिक्रमण काढून बस आगाराला अतिक्रमण मुक्त करावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्तावना पंढरीनाथ कोंकेवाड, आभार प्रदर्शन एस.जी. अनंतवार यांनी केले.यावेळी शीलरत्न ढगे वाहतूक अधीक्षक, बालाजी केंद्रे वाहतूक निरीक्षक, राजकिरण नेमानीवार वाहतूक नियंत्रक,सिद्धार्थ महादेव वाहतूक नियंत्रक, गजेंद्र दासरवार, डी. जे.कोंडे, एस. आर. जाधव, विजय कंत्रलवार, सागर पलीकोंडावार, गजानन चंद्रे वाहन चालक, उत्तम राठोड वाहक, अंकुश चव्हाण, संजय केंद्रे, विजय दार्लावार, रवी डोंगरे, हनमनलू नारलेवार, नारायण बोडके, शिषिर चव्हाण, गंगामणी बंडेवार, सुवर्णा खोकले, ज्योती कदम, संगीता वावधने, आरती ताडकुले यांच्यासह महिला वाहकांसह प्रवाशांची उपस्थिती होती. दरम्यान प्रथम प्रवासी म्हणून आ. केराम यांनी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि पत्रकारांचे तिकीट काढून प्रवास केला.



## पिंपळगाव,भनगी घाटावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-पिंपळगाव व भनगी येथे गोदावरी नदीच्या पात्रातून रेती उपसा करणाऱ्या ठिकाणी नांदेड ग्रामीण पोलीसांनी धाडी टाकुन २ कोटी १६ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. शुक्रवारी सायंकाळी नांदेड ग्रामीण पोलीसांनी रेती वाहतूक करणारे दोन हायवा पकडले होते. रेती संदर्भात त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी भनगी व पिंपळगाव येथुन रेती हायवा मध्ये भरल्याचे सांगितले. पोलीसांनी त्यानंतर पिंपळगाव व भनगी रेती घाटावर छापा टाकला. रेती उपसा करणारे फायबर बोटी, तराफे व रेती साठा असा २ कोटी १६ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला.

## नगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण होत असताना अतिक्रमण विभाग प्रमुख गप्प का?

नांदेड/प्रतिनिधी-कंधार शहरातील नगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर अतिक्रमण होत असताना संबंधित अतिक्रमण विभाग प्रमुख नेमके गप्प का होते? असा सवाल आता नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. शहरातील सार्वजनिक तसेच नगरपालिकेच्या मालकीच्या जागांवर अनधिकृत बांधकाम किंवा अतिक्रमण होत असल्यास त्यावर नजर ठेवणे आणि वेळीच कारवाई करणे ही संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. मात्र, प्रत्यक्षात अतिक्रमण होत असताना प्रशासनाच्या संबंधित विभागाला याची माहिती नव्हती का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

शहरातील एका अनधिकृत कापड सेलच्या दुकानावरून नगरपालिकेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्यात वाद निर्माण झाल्याचे समोर आले. या प्रकरणामुळे नगरपालिकेतील अंतर्गत कारभारावरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. एखाद्या अनधिकृत दुकानाच्या कारवाईवरून पदाधिकाऱ्यांमध्ये वाद निर्माण होऊन परिस्थिती गंभीर झाली असती आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असता, तर त्याची जबाबदारी नेमकी कोणाची राहिली असती? असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे. अतिक्रमण काढण्याची जबाबदारी ही राजेश जोंधळे यांचे आहे असे असतानाही अधिकाऱ्याने जाणून बुजून दुर्लक्ष केल्याने हा वाद निर्माण झाला. राजेश जोंधळे यांचा कार्यकाळ पाहिला तर नेहमीच वादग्रस्त राहिला आहे. काही दिवसापूर्वी त्यांच्या संबंधातील एक घटनेचा वाद समोर आला होता. या संदर्भात हे प्रकरण कंधार पोलीस स्थानकातही गेले होते असे असतानाही राजेश जोंधळे यांच्यावर कशीच प्रकारची वरिष्ठाकडून कारवाई न करता त्यांना मोकळीक दिली असल्याने सध्या यांची मनमानी चालू आहे असे म्हणले तर वावगे ठरणार नाही. नगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण होत असताना संबंधित विभाग प्रमुखाने वेळीच पाहणी करून कारवाई करणे अपेक्षित होते. मात्र, अतिक्रमण होईपर्यंत प्रशासनाची यंत्रणा काय करत होती, याची चौकशी होणे गरजेचे आहे.

## नांदेडसह तीन जिल्ह्यांत पावसाचा अंदाज

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील नांदेडसह काही भागांत रात्रीपासूनच पावसाच्या सरी सुरू असून, आज काही जिल्ह्यांत मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

राज्यभरात आज,शनिवारी (५ सप्टेंबर) दहीहंडी उत्सवाचा उत्साह पाहायला मिळत आहे. मुंबई, ठाण्यासह विविध शहरांत गोविंदा पथके मानाच्या आणि बक्षिसांच्या हंड्या फोडण्यासाठी सज्ज झाली आहेत. ढोल-ताशांचा गजर आणि गोविंदांच्या उत्साहात यंदा पावसाचीही भर पडण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नाशिक आणि मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यात काही ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस होण्याची शक्यता आहे. दुपारनंतर आणि संध्याकाळच्या सुमारास वातावरणात बदल होऊन विजांच्या कडकडाटासह पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे दहीहंडी उत्सवासाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांसह गोविंदा पथकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.राज्याच्या उर्वरित भागांत पावसाचा जोर तुलनेने कमी राहण्याची शक्यता आहे. अनेक ठिकाणी दिवसभर ढगाळ वातावरण राहू शकते. काही भागांत ऊन-सावलीचा खेळ सुरू राहण्याची शक्यता असून, तुरळक ठिकाणी हलक्या सरी पडू शकतात. मात्र, सध्या राज्यभर जोरदार पावसाची शक्यता कमी आहे.दरम्यान, मध्य प्रदेश आणि लगतच्या परिसरात सक्रिय असलेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचा परिणाम राज्यातील हवामानावर होत आहे. या हवामान प्रणालीशी संबंधित चक्राकार वाऱ्यांची स्थिती समुद्रसपाटीपासून सुमारे ७.६ किलोमीटर उंचीपर्यंत असल्याचे सांगण्यात आले आहे. पुढील दोन दिवस ही प्रणाली याच परिसरात राहण्याची शक्यता असून, तिच्या प्रभावामुळे आगामी काही दिवसांत महाराष्ट्रातील पावसाचा जोर पुन्हा वाढू शकतो.

## सौ.लतातार्इ फाळके यांची भाजप महिला मोर्चा जालना प्रभारीपदी नियुक्ती

हदगांव/प्रतिनिधी-भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या जालना शहर प्रभारीपदी सौ. लतातार्इ फाळके पाटील यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्यासोबत कल्पना डांगे यांचीही निवड झाली आहे. पक्षसंघटन अधिक मजबूत करण्यासाठी ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

भाजपा महिला मोर्चा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षा आ.चित्रातार्इ वाघ यांच्या मान्यतेने राज्यातील जिल्हा अध्यक्ष व जिल्हा प्रभारींच्या नावांची अधिकृत घोषणा करण्यात आली. मराठवाडा विभागांतर्गत



जालना शहरातील महिला मोर्चाचे काम तळागाळापर्यंत पोहोचवणे आणि पक्षाच्या संघटनात्मक कार्याला अधिक गती देणे, या उद्देशाने लतातार्इ फाळके पाटील यांच्यावर ही महत्त्वाची धुरा सोपवण्यात आली आहे. लतातार्इ यांच्या दीर्घ अनुभवामुळे जालना शहरात भाजप महिला मोर्चाचे जाळे अधिक मजबूत होईल, असा विश्वास पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी व्यक्त केला आहे.या नियुक्तीबद्दल बोलताना सौ. लतातार्इ फाळके पाटील म्हणाल्या, पक्षश्रेष्ठींनी माझ्यावर दाखवलेला विश्वास सार्थ ठरवेन. दिलेली जबाबदारी अत्यंत प्रामाणिकपणे आणि नेटाने पार पाडून महिलांचे प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध राहीन. या निवडीबद्दल त्यांनी महिला मोर्चा प्रदेशाध्यक्षा आ.चित्रातार्इ वाघ,प्रणितातार्इ देवरे यांच्यासह सर्व वरिष्ठ पक्षश्रेष्ठींचे आभार मानले.

## किनवटमध्ये कृषी आकृतिबंधाविरोधात अधिकारी-कर्मचाऱ्यांचे लेखणीबंद आंदोलन

किनवट/प्रतिनिधी-कृषी विभागाच्या प्रस्तावित आकृति-बंधाला विरोध दर्शवत महाराष्ट्र राज्य कृषीसेवा महासंघाने पुकारलेल्या राज्यव्यापी लेखणीबंद आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी किनवट तालुका कृषी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ३ सप्टेंबर पासून लेखणीबंद आंदोलन छेडले आहे.

किनवट तालुका कृषी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी आपापल्या संघटनांच्या माध्यमातून या आंदोलनात सहभागी झाले आहेत. त्यात तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत निमोड, मंडळ कृषी अधिकारी बालाजी शेन्नेवाड, उप कृषी अधिकारी शिवाजी जाधव, सहाय्यक कृषी अधिकारी विकास पुरी, यू.एस.जोंधळे, किशोर मामिडवार यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश असल्याचे सुत्रांनी सांगितले.कृषी सेवा महासंघाने कृषी आयुक्तांना २९ ऑगस्ट रोजी दिलेल्या निवेदनात प्रस्तावित आकृतिबंधावर आक्षेप नोंदविला असून आकृतिबंध हा शेतकरी, कृषी विद्यार्थी आणि तांत्रिक अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या भविष्यातील गरजांचा विचार झालेला नसल्याचा संघटनेचा दावा आहे. सध्याचा आकृतिबंध रद्द करून कृषी क्षेत्राचा अनुभव



असलेल्या निवृत्त सनदी अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसमावेशक तज्ज्ञ समिती स्थापन करावी आणि तिच्यामार्फत नवीन आकृतिबंध तयार करावा, अशी महासंघाची मागणी आहे. नवीन आकृतिबंधात मोठ्या प्रमाणात पदे कमी करण्याचा प्रस्ताव असून, प्रत्यक्ष गरज असलेल्या तांत्रिक पदांची वाढ करण्याऐवजी उपलब्ध मनुष्यबळाची फेररचना करण्यावर भर दिला जात आहे. दुसरीकडे, शासनाने मनुष्यबळ नियोजनासाठी शेतकरी खातेदार संख्येऐवजी भौगोलिक क्षेत्रफळाचा निकष स्वीकारला असला, तरी अधिकारी वर्ग या निर्णयावर समाधानी नसल्याचे समजते. ७ सप्टेंबरला सामूहिक रजा घेऊन पुणे येथील कृषी आयुक्तालयासमोर धरणे आंदोलन, ९ सप्टेंबरपासून शासनाच्या सर्व प्लिकेशन्सवर बहिष्कार, ११ सप्टेंबरला शासनाकडून मिळालेले लॅपटॉप कार्यालयात जमा करणे, १५ ते १८ सप्टेंबरदरम्यान शासकीय सभा व ऑनलाइन कामकाजावर बहिष्कार आणि २१ सप्टेंबरपासून बेमुदत कामबंद आंदोलन करण्याचे निवेदनातून स्पष्ट केले आहे.

# उत्सवाचा आनंद,शांततेचा सन्मान;पण कर्णकर्कश डीजे नकोच

## डीजे मुक्त उमरखेडकडे वाटचाल,सामाजिक ऐक्याचा नवा आदर्श

उमरखेड/प्रतिनिधी-उत्सवाला आमचा विरोध नाही, तर कर्णकर्कश ध्वनीला विरोध आहे या एकमुखी आणि संस्कारी भूमिकेतून उमरखेड शहर व तालुक्यातील सामाजिक, धार्मिक, व्यापारी, पर्यावरणप्रेमी आणि सेवाभावी संघटनांनी डीजे बंदी कायम ठेवण्यासाठी एकजूट दाखविली आहे.गणेशोत्सव, सर्व धार्मिक सण, जयंती उत्सव, मिरवणुका, तसेच लग्न समारंभ व वरातींमध्ये डीजे मुळे होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाला कायमस्वरूपी आळा बसावा, या मागणीसाठी शहरातील सर्व स्तरातून प्रशासनाकडे निवेदनाद्वारे आग्रह धरण्यात आला आहे.

गेल्या वर्षभरापासून शहरात डीजेवर निर्बंध असल्याने सर्व सण-उत्सव अत्यंत शांततेत, उत्साहात आणि सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडले आहेत. या निर्णयामुळे शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत झाली असून सामाजिक सलोखा वृद्धिंगत झाला आहे. नागरिकांनीही या निर्णयाचे मनापासून स्वागत केले आहे.या मागणीसाठी माजी आ.नामदेव ससाने, समस्या निराकरण समाधान ग्रुप, रोटरी क्लब, इनरव्हील क्लब, डॉक्टर असोसिएशन, व्यापारी व किराणा व्यापारी संघटना, औदुंबर वृक्ष संवर्धन समिती, पर्यावरण मित्र वृक्ष समिती, सार्वजनिक गणेश मंडळ, वकील संघटना, मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, सार्वजनिक दुर्गा उत्सव मंडळ, संत काशीगीर महाराज संस्थान, औदुंबर ज्येष्ठ नागरिक मंडळ, ब्राह्मण संघटना, उद्देश सोशल फाउंडेशन, जिव्हाळा संस्था, नाम फाउंडेशन यांसह पत्रकार संघटना व सुजाण नागरिक मोठ्या संख्येने एकवटले होते. या संघटनांनी उपविभागीय महसूल अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी आणि पोलीस निरीक्षक यांना प्रत्यक्ष निवेदन सादर केले आहे. तसेच मुख्यमंत्री, गृहमंत्री, जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठवून संपूर्ण उमरखेड तालुक्यात डीजे बंदी कायम ठेवण्याची विनंती केली आहे.निवेदनात म्हटले आहे की, डीजेच्या कर्णकर्कश आवाजामुळे लहान मुले, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांचे आरोग्य धोक्यात येते. पशुपक्ष्यांवरही त्याचा विपरीत परिणाम होतो. प्रचंड आवाजामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. तसेच काही वेळा आक्षेपार्ह गाण्यांमुळे सामाजिक तणाव निर्माण होण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली. डीजे बंदी हा कोणत्याही एका समाजाच्या विरोधातील निर्णय नसून, तो सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य, शांतता, सुरक्षितता आणि सामाजिक एकोपा जपण्यासाठी टाकलेले सकारात्मक पाऊल आहे, अशी स्पष्ट भूमिका सर्व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी मांडली.

## चोरीला गेलेली मोटारसायकल माहूर पोलिसांनी शोधून काढली

माहूर/प्रतिनिधी-माहूर येथील दत्तशिखर परिसरातून चोरीस गेलेली मोटारसायकल माहूर पोलिसांनी गृहरक्षक दलाच्या जवानांच्या मदतीने शोधून काढत वाहनमालकाच्या ताब्यात दिली. पोलिसांच्या या तत्पर कारवाईचे कौतुक होत आहे.

दि. २७ ऑगस्ट रोजी रात्री दत्तशिखर परिसरातून एमएच २८ बीजी ०२८७ क्रमांकाची काळ्या रंगाची एचएफ डीलक्स मोटारसायकल चोरीस गेली होती. याबाबत वाहनमालक प्रवीण गजानन इंगळे (वय २०, रा. पिंपरी माळी, ता. मेहकर, जि. बुलढाणा) यांनी माहूर पोलिसांकडे माहिती दिली होती. प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली. पोहेका सत्यपाल शिवाजी मडावी, पोका ज्ञानोबा खंदाडे तसेच गृहरक्षक दलाचे जवान अजय भिकू राठोड, अरविंद भारत राठोड, परविन गणपत जाधव आणि उमेश भीमराव भगत यांनी मोटारसायकलचा शोध घेण्यासाठी प्रयत्न केले.पोलिसांच्या अथक प्रयत्नांनंतर चोरीस गेलेली मोटारसायकल शोधून काढण्यात यश आले. त्यानंतर आज वाहनमालक प्रवीण इंगळे यांना माहूर पोलीस ठाण्यात बोलावून आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून मोटारसायकल त्यांच्या ताब्यात देण्यात आली.दत्तशिखर परिसरात चोरीस गेलेले वाहन अल्पावधीत शोधून काढल्याने माहूर पोलिसांच्या कार्यक्षमतेचे आणि गृहरक्षक दलाच्या जवानांच्या सहकार्याचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

पान १ वरुन

### दहीहंडीचा राज्यात थरार;...

केली जाणार आहेत. शिवसेना आमदार रवींद्र फाटक यांच्या संकल्प प्रतिष्ठानतर्फेही दहीहंडीचे आयोजन करण्यात आले आहे. संकल्प प्रतिष्ठानचे यंदा २१ वे वर्ष असल्याने ११ थरांसाठी २१ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. ठाण्यातील टेंभी नाका दहीहंडीही मानाची मानली जाते. मुंबई आणि ठाण्यातील गोविंदा पथकांसाठी स्वतंत्र हंड्या ठेवण्यात आल्या असून, विजेत्या पथकांना प्रत्येकी १ लाख ५१ हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह दिले जाणार आहे. महिलांच्या गोविंदा पथकासाठीही १ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. मागील वर्षी जोगेश्वरीतील कोकण नगर गोविंदा पथकाने १० थर रचले होते. त्याचबरोबर जय जवान गोविंदा पथकानेही १० थरांचा मनोरा उभारला होता. कोकण नगर पथकाने सर्वप्रथम १० थर रचल्याने त्याची नोंद महाराष्ट्रातील पहिले १० मानवी थर रचणारे पथक म्हणून झाली होती. या कामगिरीची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्येही नोंद झाल्याचे सांगण्यात येते.यंदा हे पथक नवा विक्रम करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मात्र, १० थर लावून ते सुरक्षितपणे खाली उतरणे हेच यंदाचे मुख्य ध्येय आहे, असे जय जवान पथकाचे प्रमुख संदीप ढवळे यांनी सांगितले.

### तुरुंगात विषप्रयोगाचा...

दहा दिवसांपूर्वी माझी राहुल गांधी यांच्याशी भेट झाली. त्यावेळी त्यांनी मला टॉक्सिक टेस्ट करून घेण्याचा सल्ला दिला. तुमच्यासारख्या व्यक्तीला अचानक आजार होणे अनाकलनीय आहे. त्यामुळे तातडीने ही तपासणी करून घ्या, असे काँग्रेस नेते खा.राहुल गांधी यांनी सांगितल्याचे राऊत यांनी नमूद केले.

### शिक्षणमंत्री दादा भुसेंच्या...

मंजुरी देण्याची जबाबदारी शिक्षण आयुक्तांकडे देण्यात आली आहे. विद्यमान शाळांमध्ये वर्ग किंवा शाखांचा विस्तार करण्यासाठी इरादापत्र अथवा मान्यतापत्र जारी करण्याचा अधिकार प्रधान सचिवांकडे सोपविण्यात आला आहे. याशिवाय मुंबई, ठाणे, पुणे, नवी मुंबई, पिंपरी-चिंचवड, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर या महानगरपालिका क्षेत्रांमध्ये सीबीएसई, आयसीएसई, आयबी आणि आयजीसीएसई यांसारख्या विविध शिक्षण मंडळांशी संलग्नतेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे तसेच त्याचे नूतनीकरण करण्याचे अधिकार प्रधान सचिवांकडे देण्यात आले आहेत. इतर क्षेत्रांमध्ये ही जबाबदारी शिक्षण आयुक्तांकडे राहणार आहे.दरम्यान, गेल्या काही वर्षांत राज्यातील स्वयंअर्थसहाय्यित शाळांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. सुमारे दहा वर्षांपूर्वी राज्यात अशा शाळांची संख्या जवळपास १२०० होती, ती आता चार हजारांच्या आसपास पोहोचल्याचे सांगितले जाते. त्यामुळे शाळांना मान्यता, नवीन वर्ग किंवा शाखांना मंजुरी तसेच विविध शिक्षण मंडळांशी संलग्नतेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया मोठी झाली आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४